जा.क्र. झोपुप्रा /प्रस्ताव /१५०७/२०२३
दि - ११/०९/२०२३

-: जाहीर सूचना :-

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील झोपडपट्टी निष्कासीत करुन अशा मोकळया होणा-या भूखंडाची उपविभागणी करुन स्वतंत्र भूखंडावर झो.पु.प्राधिकरण कार्यालयाची ईमारत बांधण्याचा प्रस्ताव आहे. प्राधिकरणाच्या सर्व नोंदणीकृत विकसक व वास्तुविशारद यांना जाहीर सूचित करण्यात येते की, ज्यांना या कामामध्ये स्वारस्य आहे त्यांनी खालील मुद्यांवर त्यांचे परिपूर्ण प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत सादर करावेत.

(१) पुणे रेल्वे स्टेशन, शिवाजीनगर रेल्वे स्टेशन,सेनापती बापट रस्ता,औंध, वाकडेवाडी या परिसरात झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर केलेली असावी व अशा ठिकाणचा भूखंड प्राधिकरण कार्यालयासाठी प्रस्तावित करावा.

(२) योजना क्षेत्रातील भूखंडाचे जागामालकांची संमती, किमान ७०% झोपडीधारकांची संमती, योजना क्षेत्र, झोपडयांची संख्या, झोपडपट्टी घोषित केल्याची अधिसूचना, आरक्षण तपशील, तसेच अन्य सर्व आवश्यक बाबींची पडताळणी प्राधिकरणाच्या प्रचलित नियमावलीप्रमाणे होईल.

(३) योजना क्षेत्रातील झोपडयांचे निष्कासन करुन कार्यालय ईमारतीसाठीच्या स्वतंत्र भूखंडासंदर्भात बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र ४ महिन्यात प्राप्त करणे अनिवार्य असेल.

(४) भूखंडावरील पात्र झोपडीधारकांची संमती पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रचलित नियमावलीप्रमाणे घेतलेली असावी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी देय R Factor प्रमाणे अनुज्ञेय प्रोत्साहनात्मक क्षेत्र मिळेल.

(५) उपरोक्त पुनर्वसनाव्यतिरिक्त प्राधिकरणाला सदर योजना क्षेत्रातील १० ते १२ गुंठे क्षेत्राचा पूर्णत: बोजाविरहित भूखंड उपविभागणी करुन अशा भूखंडावर प्राधिकरणासाठी ३०,००० ते ३५,००० चौफूट बांधकाम क्षेत्राची कार्यालयीन ईमारत बांधणे अपेक्षित असेल.

(६) प्राधिकरण कार्यालयाच्या ईमारत बांधकाकामासाठी जास्तीत जास्त UDCPR २०२० मधील Amenity TDR ( साधारण १.५० च्या आसपास परिगणीत ) अनुज्ञेय करण्यात येईल. Amenity TDR पेक्षा कमी प्रोत्साहन क्षेत्रात ईमारत बांधकाम अपेक्षित आहे. प्राधिकरणाच्या लाभात अशा अन्य पर्यायांची पडताळणी करुन यासंदर्भातील उपाययोजनाही सूचवण्यात याव्यात. मात्र, याप्रकारणी कोणताही आर्थिक मोबदला देय नसेल.

(७) विकसकाने जागेची मोजणी करुन मोजणी नकाशा प्राधिकरणाकडे सादर केलेला असावा आणि त्या ठिकाणचे विकसकाने योजना राबवण्याबाबत ठोस नियोजन केलेले असावे.

(८) सदर प्रकरणी कार्यालयीन ईमारत कमीत कमी किती कालावधीत बांधून देण्यात येईल, त्याबाबत प्रस्तावात नेमके नमूद करावे.

(९) ईमारतीमधील आनुषंगीक सुविधा, म्हणजेच पाणीपुरवठा, जल/मलनिस्सारण, उद्वाहन आणि फर्निचर/वातानुकूलन व्यवस्था या संदर्भातील भुमिका सादर करावी.

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयात दि. ३० सप्टेंबर,२०२३ पर्यंत सादर करावेत. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन शासनाला/प्राधिकरणाला कमीत कमी प्रोत्साहन क्षेत्र द्यावे लागेल आणि तातडीने ईमारत बांधणी करण्यात येईल अशा मुद्यांवर पडताळणी करुन शासनाच्या अनुमतीने याप्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

11.9.2023

( नीलेश र.गटणे, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे